# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि. वि. वि./ 2065/2022 दिनांक: 21/03/2022

## परिपत्रक

विषय :– नियमित प्राचार्य व शिक्षक मान्यतेबाबत

संदर्भ :– विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक गों. वि./म. वि./६५/२०१८ दिनांक १५/०५/२०१८

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना कळविण्यात येते कि, संदर्भीय परिपत्रकानुसार नियमित प्राचार्य व शिक्षक मान्यतेकरिता प्रस्तावासोबत सादर करावयाच्या कागदपत्रे/दस्ताऐवज बाबतची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये प्राचार्य व शिक्षक यांचे महाविद्यालयात रुजु झाल्याचे पत्र सादर करण्याबाबत नमुद केलेले आहे. तथापि सदर यादीतुन '' रुजु झाल्याचे पत्र सादर करावे '' हि बाब वगळण्यात येत आहे.

तसेच महाविद्यालयात नियुक्त होणाऱ्या नियमित प्राचार्य व शिक्षक यांना विद्यापीठकडुन मान्यता मिळाल्यानंतरच महाविद्यालयात रुजु करुन घेण्यात यावे. विद्यापीठ मान्यतेशिवाय नियुक्त प्राचार्य व शिक्षक यांना रुजु करुन घेतल्यास सदर रुजु दिनांक विद्यापीठाकडुन ग्राहय समजण्यात येणार नाही. सदर बाबतीत कोणतेही न्यायालयीन प्रकरण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्था अध्यक्ष/सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी.

मा. प्र–कुलगुरु यांच्या आदेशानुसार

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.